**सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व संस्थामधील कार्यरत अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या (गट-ब, गट-क व गट-ड) बदल्यांचे धोरण शुध्दीपत्रक.**

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन शुद्धिपत्रक क्रमांकः बदली-२०२६/प्र.क्र.१०३/प्रा.आ.से.
८ वा मजला , गोकुलदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१
दिनांक: १३ मे, २०२६.

<u>वाचा -</u>

१) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलबांस प्रतिबंध अधिनियम, २००५
२) सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक, क्रमांक : एसआरव्ही-२०१४/मुस-३४/ प्र.क्र.३७९/१२, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१५
३) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/ कार्यासन १२, दिनांक ०९ एप्रिल, २०१८
४) सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२१
५) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन आदेश क्रमांक : बदली-२०२०/प्र.क्र.३७९/सेवा-५, दिनांक २५ मार्च, २०२१
६) शासन निर्णय क्रमांकः बदली-२०२६/प्र.क्र.१०३/प्रा.आ.से., दिनांक १५ एप्रिल, २०२६

**प्रस्तावना :**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व आरोग्य संस्था व कार्यालयांमध्ये कार्यरत असणाऱ्या गट-ब, गट-क व गट-ड मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता सर्वसमावेशक बदल्यांचे धोरण, कार्यपद्धती व निकष उक्त संदर्भ क्रमांक ६ येथील दिनांक १५ एप्रिल, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेले आहेत.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्याच्या दृष्टीने सदर शासननिर्णयामध्ये काही अनुषंगिक तरतुदींची भर घालणे व काही तरतुदींमध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याची बाब आयुक्त, आरोग्य सेवा यांच्याकडून निदर्शनास आणून देण्यात आली. त्यानुसार दिनांक १५ एप्रिल, २०२६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यासाठी शासन शुद्धिपत्रक निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे शुध्दीपत्रक निर्गमीत करण्यात येत आहे.

**शासन शुद्धिपत्रक :-**

१. **पदस्थापनेचा पदावधी कालावधी** :-

उक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद १ (अ) नंतर पुढील नवीन तरतूद समाविष्ट करण्यात येत आहे.

"गट-ब मधील राज्य शासनाचे अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता एखाद्या पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्षांचा असेल. परंतु, गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यासाठी त्याने धारण केलेल्या पदावर दोन पूर्ण पदावधींची सेवा पूर्ण केल्यानंतर तो त्या कार्यालयातून किंवा विभागातून दुसऱ्या कार्यालयात किंवा विभागात बदलीस पात्र ठरेल."

**२. टप्पा क्र. २ अंतर्गत सुधारणा:-**

उक्त शासन निर्णयाच्या परिशिष्ट-१ मधील टप्पा क्र. २ च्या शेवटी पुढील तरतूद समाविष्ट करण्यात येत आहे :-

"बदलीपात्र अधिकारी/कर्मचारी यांनी सोबत जोडलेल्या विवरणपत्र-२ मध्ये नमूद केलेल्या प्राधान्यक्रमांक १ ते ८ पैकी ते कोणत्या प्राधान्यक्रमांकात अंतर्भूत होतात याबाबतची माहिती विवरणपत्र-१ सोबत पुराव्यांसह सादर करावी.

**३. टप्पा क्र ४ मधील मुद्दा क्र.२**

उक्त शासन निर्णयाच्या परिशिष्ट-१ मधील टप्पा क्र. ४ मधील मुद्दा क्र. २ ऐवजी पुढील सुधारित मुद्दा वाचण्यात यावा -

“२. बदलीपात्र गट-ब अधिकाऱ्यांची बदलीसाठीची सेवा ज्येष्ठता यादी राज्यस्तरावर तयार करण्यात यावी तर बदलीपात्र गट-क (जिल्हा परिषदेने नियुक्त केलेले सर्व आरोग्य कर्मचारी वगळून) कर्मचाऱ्यांची यादी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावरून तयार करण्यात यावी. सदरची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांची राहील. सदरच्या याद्या अचूक असल्याची खात्री करून तसें संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी प्रमाणित करावे.”

**४. टप्पा क्र. ५ - समुपदेशनाद्वारे बदली संदर्भातील इतर धोरणात्मक बाबी (ड) (i):-**

उक्त शासन निर्णयाच्या परिशिष्ट-१ मधील टप्पा क्र. ५ अंतर्गत (ड) मधील (i) मूळ जागेवर पुन्हा बदलीस प्रतिबंध - या तरतुदीऐवजी पुढील सुधारित तरतूद वाचण्यात यावी :-

“प्रशासकीय किंवा विनंती बदल्या करताना अधिकारी/कर्मचाऱ्याने अगोदर ज्या जागी सेवा केली असेल त्या मूळ जागेवर शक्यतो बदली देण्यात येऊ नये. मात्र ही अट एकाकी पदास लागू राहणार नाही."

**५. विवरणपत्र-२ मधील सुधारणा :-**

उक्त शासन निर्णयाच्या विवरणपत्र-२ मधील प्राधान्यक्रम क्र. ७ व ८ ऐवजी पुढील सुधारित प्राधान्यक्रम वाचण्यात यावेत :-

“७. शासकीय कर्मचारी पुनर्नियुक्त माजी सैनिक."

"८. उपरोक्त अनुक्रमांक १ ते ७ मध्ये अंतर्भूत न होणाऱ्या उर्वरित बदलीपात्र अधिकारी/ कर्मचारी यांची उपलब्ध रिक्त पदे व त्यांचे पसंतीक्रम विचारात घेऊन त्यांच्या ज्येष्ठतेनुसार बदलीसाठी शिफारस करण्यात यावी."

६. **विवरणपत्र-३ मधील सुधारणा :-**

उक्त शासन निर्णयाच्या विवरणपत्र-३ मध्ये - नागरी सेवा मंडळाने समुपदेशनानंतर शिफारस करावयाच्या नमुन्यात पुढील नवीन प्राधान्यक्रम समाविष्ट करण्यात येत आहेत :-

"७. शासकीय कर्मचारी पुनर्नियुक्त माजी सैनिक."

"८. उपरोक्त प्राधान्यक्रमांक १ ते ७ मध्ये अंतर्भूत न होणारे अधिकारी/ कर्मचारी."

**७.** उक्त शासन निर्णयातील वरील नमूद बाबी वगळता उर्वरित सर्व तरतुदी कायम राहतील.

सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०२६०५१३१७२२१४९५१७** असा आहे. सदर शासन शुद्धिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHANDRAKANT ARUN VIBHUTE

Digitally signed by CHANDRAKANT ARUN VIBHUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=D772C1C0413F707CB062D972B2618CF394383162 4F050BADD48D9AEA24219790, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B37242131913CE4AD7FFA0CAA314C816327 1F8AF6410B5DFF1FC5B4C3CC19B76, cn=CHANDRAKANT ARUN VIBHUTE
Date: 2026.05.13 18:37:08 +05'30'

**(चंद्रकांत विभूते)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
४. संचालक-१/२, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई/पुणे.
५. सह संचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई.
६. सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे
७. उप संचालक, आरोग्य सेवा,सर्व परिमंडळे.
८. जिल्हा शल्य चिकित्सक,(सर्व)
९. जिल्हा आरोग्य अधिकारी, (सर्व)
१०.निवडनस्ती - प्रा.आ.से.